

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | बुधवार, 14 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 151 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा. मो. 8421577797 आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

# महामुंबई परिसरातही पारा चढाच

■ मुंबई वृत्तसंस्था

मुंबईमध्ये सांताक्रूझ येथे ३८ तर कुलाबा येथे ३६.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची मंगळवारी नोंद झाली. हे तापमान सरासरीपेक्षा अनुक्रमे ४.३ आणि ३.२ अंशांनी अधिक होते. केवळ मुंबईच नाही तर महामुंबई परिसरातही मंगळवारी पारा चढा होता. ठाणे बेलापूर इंडस्ट्रिअल इस्टेट परिसरातील नोंदीनुसार मंगळवारी कमाल तापमान ३८.२ अंश सेल्सिअस नोंदले गेले. तर रत्नागिरी येथे कमाल तापमानाचा विक्रम नोंदला गेला. रत्नागिरी येथे मंगळवारी ३९.४ अंश सेल्सिअस कमाल तापमान होते. सोमवारीही रत्नागिरी येथे ३९.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली होती.



## मेघगर्जनेसह पावसाच्या सरींची शक्यता

■ मुंबई, ठाणे, रायगड येथे गुरुवार १५ ऑक्टोबरपर्यंत उष्ण आणि दमट वातावरणाचा इशारा देण्यात आला आहे. तर रत्नागिरी येथे बुधवारी हलक्या सरींची शक्यता आहे आणि त्यानंतर गुरुवारी सकाळी उष्ण आणि दमट वातावरण असू शकेल. त्यानंतर पुन्हा संध्याकाळच्या सुमारास मेघगर्जनेसह पावसाच्या सरी पडू शकतील. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथे गुरुवार, शुक्रवार आणि शनिवारी मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. गुरुवार ते शनिवार या कालावधीत पुणे, कोल्हापूर, सातारा, तसेच या तीनही जिल्ह्यांचे घाट परिसर, सांगली आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये शुक्रवारी आणि शनिवारी यलो ॲलर्ट देण्यात आला असून या काळात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## उष्णतेमुळे पाण्याचे झपाट्याने बाष्पीभवन

■ ठाणे जिल्ह्यातील शहरांना पुरेसा पाणीपुरवठा करण्यासाठी प्रस्तावित असणाऱ्या काळू, शाई, पोशिर, कुशिवली यांपैकी एकही प्रकल्प अद्याप मार्गी लागलेला नाही. त्यामुळे भिवपुरी येथील टाटा जल विद्युत प्रकल्पामुळे बारमाही वाहणारी उल्हास नदी आणि बारवी धरणावर ठाणे जिल्ह्यातील पाणीपुरवठा अवलंबून आहे. येथील जांभूळ जलशुद्धीकरण प्रकल्पातून ठाणे, मीरा भाईंदर, नवी मुंबई, अंबरनाथ, उल्हासनगर येथील घरगुती आणि औद्योगिक वसाहतींना पाणी पुरवठा केला जातो. जुलै आणि ऑगस्टमधील पावसामुळे बारवी धरण भरले असले, तरी यंदा सप्टेंबर महिन्यातच पावसाने दडी मारली. त्यामुळे वेळेआधीच धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. त्याचप्रमाणे वाढत्या उष्णतेमुळे पाण्याचे झपाट्याने बाष्पीभवनही होत आहे. परिणामी भविष्यातील नियोजनाच्या हेतूने ऑक्टोबर महिन्यापासूनच पाणीकपात लागू करण्यात आली आहे.




# सिरसाळा पोलिसांची धडाकेबाज कारवाई!

### ५८ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त; एक आरोपी ताब्यात; एपीआय बी. बी. राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सिरसाळा पोलिसांची कामगिरी

■ **सिरसाळा, प्रतिनिधी**

सिरसाळा पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात आलेल्या धडाकेबाज कारवाईत सोन्या-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले असून, या प्रकरणात एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत अंदाजे ५८ हजार रुपये असल्याची माहिती मिळाली आहे. या कारवाईत सोन्याचे मणी असलेले मंगळसूत्र, चांदीचे ब्रेसलेट, गळ्यातील साखळी तसेच पायातील जोडवे असा सोन्या-चांदीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सिरसाळा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. बी. राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. तसेच पोलीस कर्मचारी कपिल आडेकर, आप्पा तौर आणि देवकते साहेब यांनी या कारवाईत सहभाग घेतल्याची माहिती मिळाली आहे. सिरसाळा पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरात पोलिसांच्या कामगिरीची चर्चा सुरू असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# आष्टीकर महिलांसाठी नवरात्रीत प्रथमच रंगणार दांडिया महोत्सव!

### 15, 16 आणि 17 तारखेला तीन दिवस धमाल; केवळ महिलांनाच प्रवेश, दररोज वीस आकर्षक बक्षिसे

■ **आष्टी प्रतिनिधी**

शहरातील महिलांसाठी यंदाची नवरात्र खास ठरणार असून, शहरात प्रथमच तीन दिवसीय दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या उत्साहात महिलांना दांडियाचा आनंद घेता यावा, त्यांना आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करता यावे आणि महिलांसाठी मनोरंजनाचे एक स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे आष्टी शहरातील महिलांना यंदा आपल्या गावातच दांडियाचा रंगतदार अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

नवरात्र म्हटले की देवीची आराधना, घटस्थापना, उपवास आणि दांडिया-गरब्याचा उत्साह असे चित्र पाहायला मिळते. विशेषतः मोठ्या शहरांमध्ये नवरात्रोत्सवादरम्यान दांडिया महोत्सवांची मोठी धूम असते.




मात्र, आष्टीसारख्या शहरातील महिलांनाही अशा महोत्सवाचा आनंद आपल्या गावातच घेता यावा, या हेतूने यंदा प्रथमच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे आष्टीकर महिलांमध्ये या महोत्सवाबाबत उत्सुकता निर्माण होण्याची शक्यता आहे.

#### तीन दिवस दांडियाची रंगत!

हा दांडिया महोत्सव दि. १५, १६ आणि १७ रोजी आयोजित करण्यात येणार असून, दररोज सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत दांडियाचा कार्यक्रम रंगणार आहे. या महोत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये केवळ महिलांनाच प्रवेश दिला जाणार आहे.

महिलांना सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात नवरात्रोत्सव साजरा करता यावा,यासाठी आयोजकांनी ही संकल्पना राबविली आहे.या तीन दिवसीय महोत्सवात महिलांना पारंपरिक दांडियाच्या तालावर ठेका धरता येणार असून, नवरात्रोत्सवाचा आनंद द्विगुणित करण्याची संधी मिळणार आहे. आपल्या मैत्रिणींसोबत, कुटुंबातील महिलांसोबत या कार्यक्रमात सहभागी होऊन नवरात्रीच्या उत्सवाचा आनंद घेता येणार आहे.

#### दररोज वीस महिलांना आकर्षक बक्षिसे

या महोत्सवात सहभागी होणाऱ्या महिलांसाठी आकर्षक बक्षिसांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. महोत्सवाच्या प्रत्येक दिवशी लकी ड्रॉच्या माध्यमातून वीस महिलांची निवड करून त्यांना आकर्षक बक्षिसे दिली जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. त्यामुळे दांडियाच्या आनंदासोबतच बक्षिसे जिंकण्याची संधीही महिलांना मिळणार आहे.आष्टी शहरात प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या या महोत्सवामुळे महिलांना मनोरंजनाची एक वेगळी पर्वणी उपलब्ध होणार आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात येत आहे.

#### महोत्सवात सहभागी होण्यासाठी संपर्क साधा

या दांडिया महोत्सवात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिलांनी मनिषा चौरे, कल्पना मेहेर, मनिषा गोल्हार, वर्षा भंडारी, सायली हंबर्डे, कांचन गोल्हार, निकिता रानडे आणि अर्चना धस यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# डोंगरतुकाई देवी मंदिरात रांगोळीतून साकारले दुर्गामातेचे रूप!

### मैथिली लोंढे यांचे १२ तासांचे परिश्रम; नवरात्रोत्सवानिमित्त कलासेवेतून भक्तिभावाचे दर्शन

■ **परळी वैजनाथ : प्रतिनिधी**

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त परळीतील श्री डोंगरतुकाई देवी मंदिरात रांगोळीतून दुर्गामातेचे मनमोहक रूप साकारण्यात आले आहे. कलावंत मैथिली लोंढे आणि त्यांच्या सहकारी आशा शिंदे यांनी तब्बल १२ तास परिश्रम घेत ही आकर्षक रांगोळी साकारली. त्यांच्या या कलाकृतीतून देवीभक्तीबरोबरच कलेप्रती असलेली निष्ठा आणि समर्पणाचे दर्शन घडत आहे. परळी शहरातील माणिकनगर भागातील

मैथिली लोंढे या 'कलामय आर्ट क्लासेस'च्या संस्थापिका आहेत. त्यांना लहानपणापासूनच कलेची आवड असून, पेंटिंग, रांगोळी आणि पेन्सिल स्केचिंग अशा विविध कलाप्रकारांत त्या सातत्याने काम करतात. मात्र, रांगोळी हा त्यांचा विशेष आवडीचा कलाप्रकार आहे. गेल्या आठ ते नऊ वर्षांपासून त्या विविध मंदिरात सेवाभावाने रांगोळी साकारत आहेत..पूर्वी महाशिवरात्रीनिमित्त २०२३ मध्ये प्रभू वैद्यनाथ मंदिरात त्यांनी शंकर-पार्वतीची भव्य रांगोळी साकारली होती. तसेच श्री संत जगमित्र नागा



मंदिरात गजानन महाराजांच्या पालखी आगमनावेळी गजानन महाराज आणि विठ्ठल-रुक्मिणी यांची रांगोळी काढली होती. काळाराम मंदिरात प्रभू श्रीरामांचे रूपही त्यांनी रांगोळीतून साकारले आहे.

श्री डोंगरतुकाई देवी मंदिरातही कलासेवा करण्याची त्यांची मनापासून इच्छा होती. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून मैथिली लोंढे आणि आशा शिंदे यांनी एकत्रितपणे दुर्गामातेची रांगोळी साकारली. या कलाकृतीसाठी दोघींनी दोन दिवसांत नियोजनबद्ध मेहनत घेतली, तर प्रत्यक्ष रांगोळी साकारण्यासाठी सुमारे १२ तासांचा वेळ दिला. कलेला भक्तीची जोड देत साकारलेले दुर्गामातेचे हे रूप मंदिरात येणाऱ्या भाविकांचे लक्ष वेधून घेत असून, नवरात्रोत्सवातील धार्मिक वातावरणात कलात्मकतेची सुंदर भर घालत आहे.



# अंबाजोगाईतील सर्वात मोठ्या घरफोडीचा छडा; पोलीस निरीक्षक शरद जोगदंड व पथकाचा गौरव!

### पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याकडून प्रशस्तीपत्र देऊन अभिनंदन

■ **अंबाजोगाई प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या मोठ्या घरफोडीच्या गुन्ह्याचा यशस्वी तपास करून सर्व आरोपींना ताब्यात घेण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावल्याबद्दल पोलीस निरीक्षक मा. शरद जोगदंड व त्यांच्या पथकाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत पोलीस अधीक्षक मा. नवनीत कावत यांनी पोलीस निरीक्षक शरद जोगदंड व त्यांच्या संपूर्ण पथकाचे विशेष कौतुक करून त्यांना प्रशस्तीपत्र देऊन अभिनंदन केले.

घरफोडीच्या या गंभीर गुन्ह्याचा तपास पूर्ण करत आरोपींना ताब्यात घेण्यासाठी अंबाजोगाई शहर पोलिसांनी केलेल्या प्रयत्नांमुळे तपासाला यश मिळाले. गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी पथकाने केलेली मेहनत, तपासातील तत्परता आणि समन्वय यांचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी कौतुक केले. पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी केलेल्या या गौरवामुळे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड आणि त्यांच्या पथकाच्या कामगिरीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल पोलीस निरीक्षक शरद जोगदंड व त्यांच्या संपूर्ण टीमचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत असून, पुढील काळातही अशीच उत्कृष्ट कामगिरी घडावी, यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.




# ‘पदक जल्लोषा’ पलीकडचे वास्तव!

जपान येथील एशियाडमध्ये पदकविजेते भारतीय खेळाडू, प्रशिक्षक, सहायक, संघटना आणि पालक यांचे त्रिवार अभिनंदन आणि सार्थ अभिमान! मात्र, या ‘पदक जल्लोषा’ पलीकडे डोकावले, तर भारत हा क्रीडा महासत्ता सोडाच, किमान क्रीडासंस्कृती असलेला देश (स्पोर्ट्स नेशन) बनण्यापासूनही अजून दूर आहे. याच वास्तवाची ही परखड मीमांसा.

नवीन सहस्रकापासून खेळाच्या मैदानावर आपण मोठा पल्ला गाठला आहे. पूर्वी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी केवळ संघात निवड झाल्यानंतर आभाळाला हात टेकल्याची भावना होत असे. त्यानंतर पदकप्राप्तीचे (पोडियम फिनिश) वेध लागले आणि आता ‘गो फॉर गोल्ड’चा नारा देत डौलाने फडकणारा तिरंगा आणि सुवर्णभरारी!

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा, प्रशिक्षण, जागतिक अनुभव, तालुक्यापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत गुणवत्ता हेरून संधी देणारी व्यवस्था, अशा (आदर्शवत नसले तरी!) उत्साहवर्धक वातावरणामध्ये खेळांच्या प्रगतीचा आलेख उंचावताना आपण अनुभवत आहोत. खेळाडूच्या पदकनिश्चितपेक्षा सुवर्ण हुकले, याची आता बातमी होते. कबड्डी, क्रिकेट यासारख्या खेळांमध्ये तर, सुवर्णपदक मिळाले नसते, तरच नवल, अशी परिस्थिती असते! म्हणूनच की काय, गेल्या एशियाडमध्ये २८ सुवर्णांसह पदकांचे शतक पार केल्यानंतर यंदा २१ सुवर्णांसह ८५ पदकांपर्यंत झालेली घसरण काहीशी निराश करणारी आहे. साहजिकच, क्रीडा क्षेत्राचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन क्रमप्राप्त ठरते. ते असंतुष्ट मानसिकतेचे (सिनिकल) रुदन नसते, तर भविष्यातील यशालेख उंचाविण्याची लक्ष्यनिश्चिती ठरते. हे प्रारंभीच स्पष्ट केलेले बरे!

### ‘एक्स फॅक्टर’ कधी येणार?

खेळाडूंचे यश हे व्यक्तिगत फॉर्म, तंदुरुस्ती, दुखापती, स्पर्धेचा ड्रॉ, स्पर्धेच्या वेळची परिस्थिती, शूटिंगसारख्या तांत्रिक खेळात साधनांमधील आयत्या वेळचा बिघाड आणि मुख्य म्हणजे प्रतिस्पर्ध्याची कामगिरी, अशा अनेक घटकांवर अवलंबून असते. कधी क्षुल्लक चुकांमुळे यशसिद्धी होत नाही. खेळाडूची प्रत्येक वेळेस सर्वोत्तम कामगिरी होईलच असे नाही, हे कितीही गृहीत धरले, तरी सर्व प्रकारच्या अद्ययावत सुविधा असूनही भारतीय खेळाडू कच खातात. विजयी आघाडी घेऊन हाराकिरी करून सामना गमाविल्याची उदाहरणे आजही नियमितपणे दिसतात. असे का होते?

त्याचे पहिले उत्तर आपल्या मानसिकतेमध्ये आहे. कायम आव्हानवीर म्हणून न झगडता विजेते म्हणून दबदबा निर्माण करीत स्पर्धेत उतरणे, हे निम्मी लढाई जिंकल्यासारखे असते. ते सरावाबरोबरच आपल्या मानसिकतेत रुजावे लागते. विजेत्याच्या मनोवृत्तीने मैदानात उतरून मैदान काबीज करणे, हे आपल्या जणू रक्तातच नाही.

जेन झीच्या भाषेत सांगायचे, तर पायाभूत सुविधा, कौशल्य यांच्याच जोडीला किलिंग इन्स्टिंक्ट (विजिगीशू वृत्ती) निर्माण करणारा ‘एक्स फॅक्टर’, ‘स्वॅग’ गरजेचा आहे. ‘गो गेट इट’, ‘रॉक इट बेबी’ अशी मानसिकता महत्त्वाची ठरते. किंबहुना, आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेकदा तीच निर्णायक ठरतो. ती कुठे, कुणी शिकवून, सराव करून मिळत नाही. ती अंगभूत असावी लागते, किंवा बाणवावी लागते. हा ‘एक्स फॅक्टर’ आपण विकसित होऊच देत नाही. पराभवाने खचून जाऊ नये. विजयाचा उन्माद करू नये, हे ठीक. पण, ताठ मानेने जगाच्या नजरेला नजर भिडवून वरचष्मा प्रस्थापित करण्यासाठीची अत्यावश्यक मानसिकता आपण फुलू देत नाही. आणि नंतर मग निसटत्या, जिव्हारी लागणाऱ्या पराभवानंतर चरफडत बसतो.

टोकाच्या स्पर्धेत विजयश्री खेचून आणण्यासाठी खेळाबाहेरील इतर घटक व व्यवस्थेचादेखील (इको सिस्टिम) कस लागतो. क्रीडा नियमावलीपासून (स्पोर्ट्स कोड) इतर सर्व नियमावलींचा (कथित?) आधार आता देण्यात आला आहे. त्याच्या जोरावर खेळाडूंना फक्त आणि फक्त आपल्या खेळावरच लक्ष केंद्रित करता येईल, अशी प्रगत क्रीडा देशांसारखी आश्वस्त व्यवस्था निर्माण करणे गरजेचे ठरते. त्यासाठी भक्कम, दोषमुक्त संघटना, उत्तरदायित्व मानणारे समर्पित पदाधिकारी आणि कोणताही अहंभाव न राखता पूरक ठरणारी व्यवस्था ही त्रिसूत्री निर्णायक ठरेल. ती भारतामध्ये खरेच आहे का?

### अर्थकारण निर्णायक, पण...

यंदाच्या एशियाडसाठी नोव्हेंबर २०२३ ते ऑगस्ट २०२६ या कालावधीसाठी ७०३ कोटींची तरतूद करण्यात आली होती. त्यामध्ये दैनंदिन खर्चाव्यतिरिक्त देशात आणि परदेशात प्रशिक्षण, भारतीय-परदेशी प्रशिक्षक आणि पूरक व्यवस्था, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील सहभाग आदींचा समावेश होता. एशियाडमध्ये सहभागी झालेल्या ४९५ खेळाडूंपैकी तब्बल ४२७ खेळाडूंचा त्यामध्ये समावेश होता. टार्गेट ऑलिम्पिक पोडियम (टॉप्स), टार्गेट एशियन गेम्स ग्रुप, राष्ट्रीय गुणवत्ता केंद्रे, खेलो इंडिया गुणवत्ता खेळाडू आणि राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरांमधील गुणवत्ता खेळाडू अशा केंद्रपुरस्कृत विविध योजनांच्या माध्यमातून मिशन एशियाडला बळ देण्यात आले. आता कुणी म्हणेल, ७०३ कोटी रुपये खर्चून फक्त ८५ पदके हाती लागली. म्हणजेच, प्रतिपदक सुमारे साडेआठ कोटी रुपयांची किंमत आपण मोजली! व्यवसायाप्रमाणे गुंतवणुकीतून परतावा (रिटर्न ऑन इन्व्हेस्टमेंट) असे काही खेळांकडे बघितले जात नाही.

# सावरगाव घाट येथे २० ऑक्टोबर रोजी भव्य दसरा मेळावा ; लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे ‘लोकनेते वारसा प्रतिष्ठान’चे आवाहन

**आष्टी प्रतिनिधी :**

संत भगवान बाबांचे जन्मगाव असलेल्या पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट (भगवान भक्तीगड) येथील यंदाचा भव्य दसरा मेळावा आगामी २० ऑक्टोबर रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. संत भगवान बाबांपासून सुरू झालेली आणि लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी जोपासलेली ही ऐतिहासिक परंपरा यंदाही नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्त्वाखाली अत्यंत दिमाखात पार पडणार आहे. या महामेळाव्याला राज्यभरातून लाखोंच्या संख्येने समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ‘लोकनेते वारसा प्रतिष्ठान’च्या वतीने करण्यात आले आहे.

परंपरेची अखंड साखळी आणि दिग्गजांची उपस्थिती

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी सुरू केलेल्या या दसरा मेळाव्याच्या परंपरेने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व सामाजिक जीवनात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. यंदाही हाच आदर्श डोळ्यांसमोर ठेवून हा सोहळा संपन्न होत आहे. या मेळाव्यात राज्याचे नेते, माजी मंत्री धनंजयजी मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्यासह विविध पक्षांचे आमदार, खासदार आणि राज्यातील नामवंत मान्यवर नेते उपस्थित राहणार आहेत. गोपीनाथराव मुंडे आणि पंकजाताई मुंडे यांना



मानणारा अठरापगड समाज, वारकरी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

### "वर्षभर कुठेही राहा, पण दसरा मेळाव्याला सावरगावला दिसा"

संत भगवान बाबांच्या जन्मभूमीत होणाऱ्या या महामेळाव्यासाठी मुंडे भक्त आणि



समाजबांधवांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. "वर्षभर कुठेही राहा, पण दसऱ्याला सावरगावला दिसा," अशी आर्त साद घालत ‘लोकनेते वारसा प्रतिष्ठान’चे परशुराम कुटे, वैभव आंधळे, अनिकेत नागरे यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राज्यातील तमाम जनतेला या ऐतिहासिक मेळाव्याला आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.



### "गड ऊर्जेचा, गड आशेचा... चला सावरगाव घाट!"

"आम्ही येतोय, तुम्हीही चला... आपला दसरा, आपली परंपरा, गड ऊर्जेचा गड आशेचा - चला सावरगाव घाट!" असा प्रेरक नारा देत यंदाचा दसरा मेळावा विक्रमी गर्दीने ऐतिहासिक ठरवावा, असे निवेदन संघटनेतर्फे प्रसिद्धीस देण्यात आले आहे.

# दुर्गा पूजा: पौराणिक कथांपासून आजच्या वास्तवापर्यंत : डॉ. सुवर्णा कराड

**दुर्गा पूजा हा केवळ धार्मिक उत्सव नाही, तर स्त्रीशक्तीचा गौरव करणारा आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा देणारा सांस्कृतिक सोहळा आहे. विशेषतः पश्चिम बंगालमध्ये दुर्गा पूजा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. देवी दुर्गेच्या मूर्ती, आकर्षक मंडप, धार्मिक विधी, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामूहिक सहभाग यांमधून या उत्सवाचे व्यापक स्वरूप दिसून येते. मात्र, या उत्सवाकडे केवळ श्रद्धेच्या दृष्टिकोनातून न पाहता स्त्रीचे स्थान, तिचे स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि सामाजिक प्रतिष्ठा यांच्या संदर्भात पाहणेही आवश्यक आहे.**



**पौराणिक कथेनुसार, महिषासुर नावाच्या असुराने देवतांना पराभूत करून स्वर्गावर वर्चस्व प्रस्थापित केले. त्याचा पराभव करण्यासाठी देवतांच्या शक्ती एकत्र आल्या आणि देवी दुर्गेचा अवतार झाला. देवीने महिषासुराशी युद्ध करून त्याचा वध केला. या कथेतून वाईट प्रवृत्तींवर चांगल्या शक्तीचा विजय, अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि सामूहिक शक्तीचे महत्त्व अधोरेखित होते. देवी दुर्गा ही धैर्य, सामर्थ्य, निर्भयता आणि न्याय यांची प्रतीक मानली जाते.**

**या पौराणिक कथेला आजच्या सामाजिक जीवनाशी जोडून पाहिले, तर अनेक प्रश्न समोर येतात. देवीला शक्तिस्वरूप मानणाऱ्या समाजात प्रत्यक्ष स्त्रीला किती स्वातंत्र्य आणि समानता मिळते? तिच्या निर्णयांचा किती आदर केला जातो? तिला शिक्षण, रोजगार आणि नेतृत्वाच्या संधी कितपत उपलब्ध होतात? स्त्रीच्या सन्मानाविषयी उत्सवाच्या काळात व्यक्त होणारी भावना वर्षभर तिच्या दैनंदिन जीवनातही दिसते का? या प्रश्नांचा विचार करणे आवश्यक आहे.**

**आज भारतीय महिला शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, उद्योग, क्रीडा, कला आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. अनेक महिलांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन साधत आहेत. काही महिला उद्योग उभारत आहेत, तर काही सामाजिक परिवर्तनासाठी कार्यरत आहेत. महिलांच्या या कर्तृत्वातून आधुनिक दुर्गेचे दर्शन घडते.**

**तथापि, या प्रगतीबरोबरच महिलांसमोरील अनेक आव्हाने कायम आहेत. स्त्रियांवरील हिंसाचार, लैंगिक छळ, कौटुंबिक अन्याय, बालविवाह, हुंड्याची प्रथा, शिक्षणातील अडथळे आणि आर्थिक परावलंबित्व या समस्या विविध स्वरूपांत दिसून येतात. अनेक महिलांना घर आणि नोकरी या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळताना मोठा ताण सहन करावा लागतो. काही ठिकाणी मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव अजूनही आढळतो. महिलांच्या क्षमतेचा स्वीकार केला जात असला, तरी त्यांच्या स्वातंत्र्याबाबत समाजातील काही घटकांच्या विचारांत विरोधाभास दिसतो.**

**दुर्गा पूजेच्या काळात देवीच्या मूर्तीसमोर नतमस्तक होणारा समाज प्रत्यक्ष जीवनात महिलांच्या मतांचा आणि निर्णयांचा आदर करतो का, हा मूलभूत प्रश्न आहे. स्त्रीने कसे वागावे, काय परिधान करावे, कुठे जावे आणि कोणते निर्णय घ्यावेत, यावर नियंत्रण ठेवण्याची प्रवृत्ती तिच्या स्वातंत्र्याला मर्यादा घालते. स्त्रीच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी तिच्यावरच टाकण्याऐवजी समाजाने पुरुषांच्या वर्तनाबाबत, सार्वजनिक सुरक्षिततेबाबत आणि कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीबाबतही गंभीरपणे विचार केला पाहिजे.**

**स्त्रीशक्तीचा सन्मान म्हणजे केवळ महिलांचे कौतुक करणे नव्हे. त्यांना समान संधी देणे, त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, आर्थिक स्वावलंबनासाठी मदत करणे आणि त्यांच्या निर्णयस्वातंत्र्याचा स्वीकार करणे, हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. कुटुंबात मुलगा आणि मुलगी यांना समान वागणूक मिळाली पाहिजे. मुलांना लहानपणापासून स्त्रियांचा आदर करण्याची शिकवण दिली पाहिजे. महिलांविरुद्ध अन्याय झाल्यास पीडितेला दोष देण्याऐवजी तिला आधार देणे आणि न्याय मिळवून देण्यासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे.**

**दुर्गा पूजा हा सामूहिक आनंदाचा आणि सामाजिक एकतेचा उत्सवही आहे. उत्सवाच्या आयोजनात महिलांचा सहभाग, त्यांच्या कलागुणांना मिळणारे व्यासपीठ आणि सामाजिक उपक्रमांमधील त्यांचे योगदान यांना विशेष महत्त्व आहे. या उत्सवाच्या निमित्ताने स्त्रीशिक्षण, आरोग्य, स्वसंरक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि कायदेशीर हक्कांविषयी जनजागृती केली, तर धार्मिक श्रद्धेला सामाजिक परिवर्तनाची जोड मिळू शकते.**

**देवी दुर्गेची कथा आपल्याला अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देते. मात्र, आजच्या काळातील संघर्षाचे स्वरूप वेगळे आहे. तो संघर्ष अंधश्रद्धा, भेदभाव, हिंसाचार, असमानता आणि स्त्रीच्या स्वातंत्र्यावर लादल्या जाणाऱ्या बंधनांविरुद्ध आहे. या प्रश्नांवर मात करण्यासाठी कायदे, शिक्षण, सामाजिक जागृती आणि कुटुंबातील सकारात्मक संस्कार यांची आवश्यकता आहे.**

**दुर्गा पूजेचा खरा संदेश केवळ देवीच्या विजयात नाही, तर प्रत्येक स्त्रीला निर्भयपणे जगता येईल अशा समाजाच्या निर्मितीत आहे. पौराणिक कथांमधील दुर्गा ही शक्तीचे प्रतीक आहे; आजची स्त्री आपल्या कर्तृत्वाने, संघर्षाने आणि आत्मविश्वासाने त्या शक्तीचे दर्शन घडवत आहे. तिच्या यशाचा गौरव करताना तिच्या अडचणींकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.**

**देवीची पूजा आणि स्त्रीचा सन्मान या एकमेकांपासून वेगळ्या गोष्टी राहू नयेत. दुर्गा पूजेच्या उत्सवातून मिळणारी प्रेरणा दैनंदिन जीवनात उतरली, तरच स्त्रीशक्तीचा गौरव अर्थपूर्ण ठरेल. प्रत्येक स्त्रीला समानता, सुरक्षितता, प्रतिष्ठा आणि स्वतःचा आवाज व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य मिळणे, हीच दुर्गा पूजेच्या संदेशाची आधुनिक काळातील खरी अभिव्यक्ती ठरेल.**

**■ डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.**

# प्रकल्प कामे अंतिम टप्प्यात, महापालिकेचा मुदतठेवींना हात मुदत ठेवींचा आकडा मागील आठ महिन्यांत २२३० कोटींनी घटला

**मुंबई वृत्तसंस्था**

मुंबई महापालिकेच्या मुदत ठेवींच्या रकमेची चर्चा कायमच होत असते. मार्च महिन्यात मुदत ठेवींमधील ही संख्या ७७,९०५ कोटी रुपये एवढी होती. जी आता सप्टेंबर २०२६ रोजी ७९,२१९ कोटी रुपये एवढी झाली आहे. त्यामुळे ३१ मार्च महिन्याच्या तुलनेत सप्टेंबर महिन्यात मुदतठेवींमधील रक्कम कमी जास्त होवून मार्च महिन्याच्या तुलनेत चक्क १३१४ कोटी रुपयांनी वाढली गेली आहे. मुंबई महापालिकेचे प्रकल्प कामे आता अंतिम टप्प्यात असून त्याबाबतची बिलाची रक्कम आता देण्यात येत असल्याने कंत्राटदारांची पैसे देण्यासाठी महापालिकेला आता अधून मधून मुदत ठेवींमधील रकमेला हात लावला जात आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अ, ब, ई , वृक्ष प्राधिकरण आणि ग मधील विविध निधींमध्ये शिल्लक असलेला रकमा दर्शवणारा तिमाही अहवाल महापालिका स्थायी समितीला सादर करण्यात आला आहे. यामध्ये ३१ मार्च २०२६ रोजी असणारा या त्रैमासिक आर्थिक अहवालातून महापालिकेचा राखीव निधी हा सध्या ७७,९०५ कोटी रुपये आहे. यंदा फेब्रुवारीमध्ये सादर झालेल्या अर्थसंकल्पात हा निधी ८१,४४९ कोटी रुपये होता. हा राखीव निधी विविध बँकांमध्ये मुदत ठेवींच्या (एफडी) स्वरूपात ठेवलेला आहे. जानेवारी २०२६ पर्यंत असलेल्या मुदत ठेवींमधील रकमेमधून पुढील आर्थिक वर्षातील शेवटच्या दोन महिन्यांमध्ये विविध प्रकल्प कामांमधील पैसे देण्यासाठी कंत्राटदारांची बिले देण्याकरता महापालिकेला मुदत ठेवींच्या रकमांमध्ये हात घालावा लागला आहे.

महापालिका आयुक्तांनी आपल्या स २०२६-२७च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये मुदत ठेवींमधील रक्कम ८१,४४९ कोटी रुपये एवढी होती. यामध्ये विविध प्रकल्प कामांसाठी यातील ३६,६२३ कोटी रुपये राखीव निधी असून त्यातील पैसेच केवळ वापरता येणार आहे. तर ४४,८२६ कोटी रुपये हे बांधिल दायित्वापोटी राखीव निधी आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेसाठी पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांची निवड

# राष्ट्रसंघाच्या महासभेसाठी पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांची निवड

## न्यूयॉर्क येथे होणाऱ्या ८१ व्या महासभेसाठी भारताच्या २० खासदारांच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळात स्थान

जव्हार (वा.) |न्यूयॉर्क येथे १९ ते २३ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या (यूएन) ८१ व्या महासभेसाठी पाठविण्यात येणाऱ्या भारताच्या २० खासदारांच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळात पालघर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. हेमंत विष्णू सवरा यांची निवड झाल्याचे वृत्त आहे. या निवडीमुळे पालघर जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेच्या आंतरराष्ट्रीय मंचावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी या शिष्टमंडळावर सोपविण्यात आली आहे. या शिष्टमंडळात देशातील निवडक खासदारांचा समावेश असून, डॉ. सवरा यांना संधी मिळाल्याने पालघर जिल्ह्यासह महाराष्ट्रासाठी ही महत्त्वाची बाब मानली जात आहे.

या दौऱ्यादरम्यान संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावर विविध जागतिक प्रश्नांवर चर्चा, धोरणात्मक बैठका आणि परिसंवाद आयोजित केले जाणार आहेत. या चर्चांमध्ये भारताची भूमिका मांडण्याची संधी भारतीय शिष्टमंडळातील सदस्यांना मिळणार आहे.

डॉ. हेमंत सवरा यांना सामाजिक, राजकीय आणि वैद्यकीय क्षेत्रातील अनुभव असून, या अनुभवाचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चांमध्ये उपयोग होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पालघर हा आदिवासीबहुल जिल्हा असून, येथील ग्रामीण भागातील विकासाचे प्रश्न, आदिवासी समाजाच्या समस्या आणि मूलभूत सुविधांशी संबंधित मुद्द्यांना विशेष महत्त्व आहे. अशा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खासदाराला आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे, ही जिल्ह्यासाठी उल्लेखनीय बाब ठरली आहे.

या निवडीच्या वृत्तामुळे पालघर लोकसभा मतदारसंघातील नागरिक आणि कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असल्याचे सांगितले जात आहे.





## आष्टी पोलिसांचा दणका: घटस्थापनेदिवशी नियमांचे उल्लंघन करणारे डी. जे. जप्त; चालक व मालकांवर कारवाई

**आष्टी (प्रतिनिधी)**

बीड जिल्ह्यात डी. जे. वाजवण्यास बंदी असतानाही घटस्थापनेच्या दिवशी नियम धाब्यावर बसवून डी. जे. वाजवणाऱ्यांवर आष्टी पोलिसांनी कडक कारवाईचा बडगा उचलला आहे. मौजे ब्रम्हगाव फाटा, वनवेवाडी आणि कानडी शिवारात अवैधपणे सुरू असलेले डी. जे. पोलिसांनी जप्त केले असून संबंधित चालक व मालकांवर कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

घटस्थापनेच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. जिल्ह्यात डी. जे. वर बंदी असल्याने यापूर्वीच चालक व मालकांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. असे असतानाही ११ ऑक्टोबर रोजी पोलीस अधिकारी व अंमलदार गस्त घालत असताना ब्रम्हगाव फाटा, वनवेवाडी आणि कानडी शिवारात मोठ्या आवाजात डी. जे. वाजत असल्याची माहिती पथकाला मिळाली.

माहिती मिळताच डीवायएसपी पांढरे, सहायक पोलीस निरीक्षक वाघमोडे, पोलीस उपनिरीक्षक अवारे यांच्यासह पोलीस कर्मचारी शेख, पाखरे, नवले आणि लोंढे यांनी घटनास्थळी धाव घेत तात्काळ डी. जे. बंद पाडले. पोलिसांनी हे डी. जे. साहित्य जप्त करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी आष्टी पोलीस ठाण्यात आणले आहे. याप्रकरणी डी. जे. मालक व चालकांवर नियमांनुसार कारवाई केली जात आहे.




शांतता राखण्याचे पोलिसांचे आवाहन दरम्यान, आगामी देवी विसर्जन मिरवणुकीदरम्यान नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखावी. प्रशासनाने दिलेल्या सर्व नियमांचे व सूचनांचे काटेकोर पालन करून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन आष्टी पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## लिंबोटा गावाच्या शैक्षणिक प्रगतीत मानाचा तुरा!

### कु. ऋतुजा गणेश दिवटे हिची BAMS अभ्यासक्रमासाठी निवड; सत्कार समारंभ उत्साहात संपन्न

**लिंबोटा :** गावाच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. लिंबोटा येथील कु. ऋतुजा गणेश दिवटे हिची महाविद्यालयात BAMS (आयुर्वेद वैद्यकशास्त्र) अभ्यासक्रमासाठी निवड झाल्याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल आज सायंकाळी मार्केट कमिटीचे माजी संचालक श्री. सूर्यकांत आप्पा मुंडे यांच्या मथुराई निवासस्थानी कु. ऋतुजा दिवटे हिचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित मान्यवरांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये मार्केट कमिटीचे माजी संचालक श्री. सूर्यकांत आप्पा मुंडे, माजी सरपंच मोहन मुंडे, माजी सरपंच सुदाम मुंडे, ज्येष्ठ नागरिक कोंडिबा दिवटे, पोलीस पाटील लक्ष्मण दिवटे, आदर्श शिक्षक वसुदेव सर मुंडे, राजाभाऊ मुंडे, मधुकर मुंडे, विश्वनाथ मुंडे, भागवत मुंडे, विश्वनाथ मुंडे.बाबुराव मुंडे, माजी उपसरपंच मंचक मुंडे, राजाभाऊ मुंडे.विठ्ठल मुंडे, नारायण दिवटे, गणेश दिवटे, बळिराम मुंडे, उद्धव मुंडे, महादेव मुंडे, अशोक मुंडे, शुभम मुंडे आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.



कु. ऋतुजा हिच्या यशामुळे लिंबोटा गावाच्या शैक्षणिक क्षेत्रातील प्रगतीला नवी प्रेरणा मिळाली असून, तिच्या यशाचे ग्रामस्थांकडून कौतुक केले जात आहे. कार्यक्रमाच्या शेवटी आदर्श शिक्षक वसुदेव सर मुंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मुख्यमंत्री लाडकी बहिण वंचित लाभार्थ्यांच्या प्राप्त अर्ज स्विकारून समस्या निकाली काढा - जयश्री नरवाडे





**महागाव** |महागांव तालुक्यामधील मुख्यमंत्री लाडकी बहिणींचे अनुदान मिळत असतांना त्यांचे अनुदान अचानक बंद झाल्यामुळे त्या अनुदानापासुन बहुतांश महिला हया वंचित असुन त्यांना अनुदान का मिळत नाही.? या सर्व समस्याची निराकरण करण्याकरीता महागांव तालुका कॉंग्रेस कमिटी तथा महागांव तालुका कॉंग्रेस महिला कमिटी आणि महागांव शहर कॉंग्रेस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने दि. ३०/०९/२०२६ रोज बुधवारला आयोजीत कार्यक्रमामध्ये महागांव तालुक्यातील मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या महिला लाभार्थ्यांचे एकुण 1146 एवढे अर्ज प्राप्त झाले. सदरील प्राप्त अर्जांचा ढीगच बाल विकास प्रकल्प कार्यालयात आज कॉंग्रेसच्या महिला तालुकाध्यक्ष तथा नगरपंचायत नगरसेविका जयश्री नरवाडे यांच्या नेतृत्वात सुपुर्द करण्यात आले आहेत . सदरील अर्जातील महिलांचे अनुदान कशामुळे बंद झाले हयाबाबत अर्ज सोबत असलेल्या पोच पावतीवर अनुदान बंद झाल्याचे कारण देण्यात यावे आणि महागांव तालुक्यातील संपूर्ण महिला लाभार्थ्यांच्या समस्याचे निराकरण तात्काळ करण्याची मागणी महिला बाल विकास प्रकल्प यांच्याकडे कॉंग्रेसच्या महिला तालुकाध्यक्ष तथा नगरपंचायत नगरसेविका जयश्री नरवाडे यांनी मागणी केली आहे.

## "कुस्तीमल्लविद्या संघ महाराष्ट्र राज्य" च्या यवतमाळ सचिव पदी लल्ला उर्फ राधेश्याम दिंडे

**महागाव** | नेहमी सतत शेतकऱ्यांसाठी, लाभार्थ्यांसाठी व विद्यार्थ्यांच्या हितासाठी शासनाची सदा लढा देणारा सामाजिक कार्यकर्ता म्हणून लल्ला दिंडींकडे पाहिल्या जाते हे सर्व पाहता सामाजिक कार्यात अग्रेसिव पणाची भूमिका घेणारे लल्ला दिंडे कुस्तीमल्लविद्या संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने लल्ला उर्फ राधेश्याम दिंडे यांच्यावर यवतमाळ जिल्हा सचिव पदाची जबाबदारी सोपविण्यात आली,



याचे श्रेय लल्ला दिंडे यांनी कुस्तीमल्लविद्या संघ महाराष्ट्र राज्याचे सर्व पदाधिकारी तसेच जिल्हाध्यक्ष आदरणीय श्री. नाना बेले व सहकार्यांना दिले आहे.

तर या पदाच्या माध्यमातून कुस्ती या मातीतल्या खेळाच्या विकासासाठी, नवोदित मल्लांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि कुस्ती संस्कृतीचा वारसा पुढे नेण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प लल्ला दिंडे यांनी यावेळी केला आहे .

## बीडमध्ये १६ ऑक्टोबरला रिपब्लिकन पक्षाची विराट जाहीर सभा!

### केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची प्रमुख उपस्थिती; परळीतून हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते सहभागी होणार – शरण मस्के

**परळी** : शेतकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी आणि वंचितांच्या हक्कांसह विविध मागण्यांसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), जिल्हा बीड यांच्या वतीने शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी बीड येथे विराट जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या जाहीर सभेचे आयोजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. वंचित, शोषित, शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तसेच त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज बुलंद करण्याच्या उद्देशाने या सभेचे आयोजन करण्यात आले आहे.





**परळीतून हजारो कार्यकर्ते सहभागी होणार!**

या विराट जाहीर सभेला परळी तालुक्यातून हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित राहणार असल्याची माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे परळी तालुकाध्यक्ष शरण मस्के यांनी दिली. सभेचे आयोजक पप्पूजी कागदे यांचे हात बळकट करण्यासाठी तसेच पक्षाची ताकद दाखवून देण्यासाठी परळी तालुक्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

**सभेचे ठिकाण : छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड.**

**वेळ : शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता.**

या सभेला परळी तालुक्यातील रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आंबेडकरी चळवळीतील नागरिकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, परळी तालुका यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी मुंबईकरांचा मदतीचा हात; चंदोशी शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

### मुंबईतील पाच तरुणांचा स्तुत्य उपक्रम; विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भविष्यातही सहकार्य करण्याचे आश्वासन

**जव्हार (वा.)** | पालघर जिल्ह्यातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्यासाठी मुंबईतील पाच तरुणांनी सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेतला. आई श्री सेवाभावी संस्थेच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत या तरुणांनी जव्हार तालुक्यातील अतिदुर्गम चंदोशी जिल्हा परिषद शाळेसह परिसरातील इतर शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, परिसरातून या सामाजिक कार्याचे कौतुक होत आहे.

मुंबई येथील प्रकाश सदाशिव शाळीग्राम, चिन्मय शिरीष आगटे, प्रतीक शिरीष आगटे, प्रणव उदय जोशी आणि कौस्तुभ अजय परांजपे या पाच तरुणांनी विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या उद्देशाने पहाटे सहा वाजता मुंबईहून प्रवास सुरू केला. दुर्गम भागातील शाळांपर्यंत पोहोचत त्यांनी विद्यार्थ्यांना वह्या, पाट्या, पेन्सिली, पेन आदी आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.



' सारे भारतीय माझे बांधव आहेत' या प्रतिज्ञेतील विचार कृतीतून जपला!

'सारे भारतीय माझे बांधव आहेत' या राष्ट्रीय प्रतिज्ञेतील बंधुभाव आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश या तरुणांनी आपल्या कृतीतून अधोरेखित केला. समाजातील वंचित आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत त्यांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. तसेच, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भविष्यातही शक्य ते सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. या उपक्रमाचे नियोजन शाळेचे शिक्षक खानझोडे सरांनी केले.



या कार्यक्रमात रुईघर ग्रामपंचायत सरपंच श्रीमती अंतूना घाटाळ मॅडम, ग्रामपंचायत सदस्य श्री. अतुल घाटाळ शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शांताराम घाटाळ ग्रामपंचायत सदस्य कमल विष्णू घाटाळ, सदस्य अनिता कैलास घाटाळ केंद्रप्रमुख मधुकर कावजी भोये सर आदी मान्यवर उपस्थित राहून विद्यार्थी आणि उपस्थितांना मार्गदर्शन केले.

दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले आहे. केवळ आर्थिक मदत किंवा साहित्याचे वाटप न करता, विद्यार्थ्यांच्या भविष्याबद्दल आस्था व्यक्त करणारा हा उपक्रम समाजातील इतर दानशूर व्यक्ती आणि संस्थांसाठीही प्रेरणादायी ठरणारा आहे.

शिक्षणाच्या प्रवाहात प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी मिळावी, या भावनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक जाणीव, माणुसकी आणि सहकार्याचा सुंदर आदर्श ठरला आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

• बीड, बुधवार, 14 ऑक्टोबर 2026

# पृथ्वीवर देवीचे रूप म्हणजे स्त्री होय! नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांचे प्रतिपादन

## तेली समाज दांडिया महोत्सवाचे पाचवे पुष्प उत्साहात

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

"पृथ्वीवर देवीचे रूप म्हणजे स्त्री होय. स्त्रीमध्ये प्रेम, माया, करुणा आणि शक्ती यांचा सुंदर संगम असतो. त्यामुळे स्त्रीचा सन्मान करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे," असे प्रतिपादन परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी केले. तेली समाजाच्या वतीने आयोजित दांडिया महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

परळी येथे गेल्या चार वर्षांपासून तेली समाजाच्या वतीने दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असून, यंदा या महोत्सवाचे पाचवे पुष्प मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येत आहे. सोमवारी (दि. १२) आयोजित उद्घाटन समारंभाला नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, तेली समाजाचे अध्यक्ष विठ्ठल आप्पा चौधरी, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, सचिव प्रा. मधुकर शिंदे आणि तालुकाध्यक्ष मनोज जठार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते देवीची पूजा व आरती करण्यात आली. त्यानंतर स्वागत समारंभ पार पडला. नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी आणि माजी नगराध्यक्ष बाजीराव






धर्माधिकारी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून दांडिया महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी स्त्रीशक्तीचा गौरव करत महिलांचा सन्मान आणि सामाजिक उत्सवांमधील महिलांचा सहभाग यांचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमास मलिकार्जुन साखरे, नागनाथ आप्पा भाग्यवंत, छगन आप्पा क्षीरसागर, अशोक बेंडे, चंद्रशेखर फुटके, ओंकार सोनटक्के, अजय सोनटक्के, शिवशंकर जठार, विनोद आळणे, शिवराज सोनटक्के, सोमनाथ क्षीरसागर, महारुद्र विटेकर यांच्यासह तेली समाज दांडिया उत्सव समितीचे अध्यक्ष तथा युवानेते पवन फुटके, सोमनाथ वाघमारे, अशोक रोकडे, राजकुमार भाग्यवंत, सचिन लासे, सतीश फुटके, राहुल क्षीरसागर, सुनील क्षीरसागर, दीपक साखरे, ईश्वर राऊत, रवी अन्नपूर्णे, शंकर कौले, ईश्वर जठार, गजानन बेंडे, प्रदीप पिंपळे, महेंद्र अन्नपुर्णे, अमोल क्षीरसागर योगेश व्यवहारे आणि प्रसाद जठार उपस्थित होते. तेली समाजाच्या या दांडिया महोत्सवामुळे समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, सांस्कृतिक परंपरेचे जतन आणि सामाजिक एकोपा वृद्धिंगत करण्याचा संदेश या महोत्सवातून दिला जात आहे.

# मराठवाड्याच्या हक्कासाठी एल्गार - १४ ऑक्टोबरला छत्रपती संभाजीनगरात "जन आक्रोश दुष्काळ मोर्चा"

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :**

मराठवाड्यातील भीषण दुष्काळ आणि सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांविरोधात बुलंद आवाज उठवण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने "जन आक्रोश दुष्काळ मोर्चा" चे आयोजन करण्यात आले आहे. तरी परळी वैजनाथ तालुक्यातील सर्व शेतकरी, कष्टकरी, युवक, कार्यकर्ते व नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन परळी तालुका काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रकाश मुंडे आणि शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष शिवाजी देशमुख यांनी केले आहे.

मराठवाड्यातील भीषण दुष्काळ आणि सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांविरोधात बुलंद आवाज उठवण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने "जन आक्रोश दुष्काळ मोर्चा" चे आयोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी एल्गार पुकारत दुष्काळग्रस्त मराठवाड्याचा हा जनआक्रोश बुधवार, दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता छत्रपती संभाजीनगर* येथे होणार आहे. या मोर्चाचा मार्ग पैठण गेट ते विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर असा असणार आहे. "मराठवाड्यातील





भीषण दुष्काळ आणि सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांविरोधात बुलंद आवाज उठवण्यासाठी चला एकत्र येऊ या!" असे आवाहन काँग्रेस पक्षाकडून करण्यात आले आहे. काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे नेतृत्व व प्रमुख उपस्थिती - या महामोर्चाचे नेतृत्व AICC प्रभारी (महाराष्ट्र राज्य) मा. डॉ. श्री. सिरीवेल्ला प्रसाद आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. हर्षवर्धन सपकाळ हे करणार आहेत. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून काँग्रेस विधीमंडळ पक्षनेते मा. श्री. विजय वडेट्टीवार, माजी मंत्री तथा काँग्रेस कार्य समिती सदस्य मा. श्री. बाळासाहेब थोरात, माजी मंत्री मा. श्री. आ.अमित देशमुख, जालना लोकसभेचे खासदार मा. डॉ. कल्याण काळे, नांदेड लोकसभेचे खासदार मा. श्री. रविंद्र चव्हाण आणि लातूर लोकसभेचे खासदार मा. डॉ. शिवाजी काळगे तसेच माजी खासदार तथा काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्या रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकदादा पाटील, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस आदित्यदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे हे उपस्थित राहणार आहेत.

मराठवाडा सध्या भीषण दुष्काळाच्या झळा सोसत आहे. शेतात पीक नाही, हाताला काम नाही, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. अशा वेळी सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले असून शेतकरीविरोधी धोरणे राबवली जात आहेत. त्यामुळे या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी परळी तालुक्यातून जास्तीत जास्त संख्येने छत्रपती संभाजीनगर येथील जन आक्रोश दुष्काळ मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन तालुकाध्यक्ष प्रकाश मुंडे आणि शहराध्यक्ष शिवाजी देशमुख यांनी केले आहे.

शेतकऱ्यांच्या हक्काच्या लढाईत सर्वांनी एकजुटीने सहभागी होऊन हा मोर्चा यशस्वी करावा यासाठी तरी परळी वैजनाथ तालुक्यातील सर्व शेतकरी, कष्टकरी, युवक, कार्यकर्ते व नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन परळी तालुका काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रकाश मुंडे आणि शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष शिवाजी देशमुख यांनी केले आहे.



## आष्टी पोलिसांची अवैध धंद्यांवर मोठी कारवाई; १८ छापे टाकून साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त

**आष्टी प्रतिनिधी :** पोलीस स्टेशन आष्टी हद्दीत अवैध धंद्यांवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. १ ऑक्टोबर २०२६ ते १० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या १८ छाप्यांमध्ये एकूण ४,४०,४८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमध्ये देशी व विदेशी दारू, हातभट्टीची दारू, गाई आणि इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्री. डी. वाय. एस. पी. भारत पांढरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन आष्टी यांनी १ ऑक्टोबर २०२६ ते १० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे एकूण १८ छापे मारून ही मोठी कारवाई केली. यामध्ये पोलीस स्टेशन आष्टी हद्दीतील विविध ठिकाणी छापे टाकण्यात आले. पहिली कारवाई हॉटेल/ ढाबे यावर दारू विक्री करणाऱ्यांवर करण्यात आली. एकूण १५ छापे मारून देशी व विदेशी दारू तसेच हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली. या कारवाईमध्ये एकूण २,१०,०९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दुसरी कारवाई मौजे खडकत येथे करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, तेथे अवैध रित्या गोवंशी प्राण्यांची कत्तल करण्यासाठी गाई मिळाल्याने तेथे रेड करून एकूण ५०००० रुपयांची कारवाई करण्यात आली. तिसरी कारवाई पोलीस स्टेशन हद्दीत मौजे केरूळ व चिंचपूर अशा एकूण दोन ठिकाणी छापे मारून करण्यात आली. या कारवाईमध्ये १,८०,३९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अशा प्रकारे, १ ऑक्टोबर २०२६ ते १० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत एकूण १८ छापे मारून ४,४०,४८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब, बीड मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख साहेब, बीड व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विश्वजीत खुळे साहेब आष्टी यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आली. प्रभारी अधिकारी डी. वाय. एस. पी. श्री. भारत पांढरे यांच्या नेतृत्वात सपोनि वाघमोडे, पोउपनि आवारे व पोकों , शेख, पोकॉ पाखरे, पोह, असे कर्मचारी या कारवाईमध्ये सहभागी होते.

# सुशील घोटे यांची मतदार संघात सुप्त लाट

## लाटेचे रुपांतर विजयात करण्यासाठी त्यांनाच प्रथम पसंतीची मते देवून विजयी करा - बंडू अघाव

**परळी / प्रतिनिधी**

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघात २३ ऑक्टोंबर रोजी निवडणूक होत आहे. निवडणुकीसाठी मराठवाडा शिक्षक संघाने सुशील सुरेशराव घोटे यांच्यासारखा तरुण तडफदार,अभ्यासू व नवजवान युवकाला उमेदवारी दिली आहे.त्यांच्या बाजूने मतदारसंघात सुप्त लाट निर्माण झाली असून या लाटेचे रुपांतर विजयात करण्यासाठी मतदारांनी सुशील घोटे यांनाच प्रथम क्रमांकाच्या पसंतीची मते देऊन विजयी करावे असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बंडू अघाव यांनी केले आहे.

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघाची येत्या २३ ऑक्टोंबर रोजी निवडणूक होत आहे.सुशील घोटे हे मराठवाडा शिक्षक संघाची अधिकृत उमेदवारी घेऊन





स्वतः हाचे नशिब आजमावत आहेत.त्यांच्या प्रचारार्थ परळी शहरातील विविध शाळा/महाविद्यालयांना बंडू अघाव यांनी भेटी दिल्या यावेळी तेथील मतदारांशी संवाद साधताना अघाव यांनी वरील प्रमाणे आवाहन केले.

पुढे बोलताना अघाव म्हणाले की, मराठवाडा शिक्षक संघाने प्रथमच या मतदारसंघात सुशील घोटे यांच्या रूपाने अधिकृत उमेदवार दिला असून तो संघटनेचे माजी शिक्षक आमदार स्व.प.म.पाटील यांचे पुतणे आहेत.घोटे हे तरुण तडफदार व अभ्यासू आहेत.त्यांना निवडून दिल्यास ते सभागृहात विद्यमान आमदारासारखे हाताची घडी तोंडावर बोट असे न बसता ते निश्चितच शिक्षक, प्राध्यापक व पदविकाधारकांच्या प्रश्नांना वाचा फोडल्याशिवाय व न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीत असा विश्वास अघाव यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी त्यांच्या सोबत स्वतः उमेदवार सुशील घोटे,मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अशोक मस्कले, तालुका अध्यक्ष अनुप कुसूमकर, उपाध्यक्ष ज्ञानोबा गडदे, कोषाध्यक्ष एकनाथ लांडगे, संजय फड आदी उपस्थित होते. प्रत्येक शाळा/महाविद्यालयात उमेदवारांचे उत्साह पुर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.